## <u>: निशाणी २० वर आदेश :</u>

१. प्रस्तुत अर्ज वादीने महादेव रामा आंबेकर यांना प्रतिवादी पक्षकार म्हणुन सामील करण्यासाठी व त्या अनुषंगाने दाव्याचे सरनाम्यात दुरूस्ती करून मिळण्यासाठी व दावा कलम १ मध्ये गावठाण क्. १/४३ ची मिळकत दावामिळकत म्हणुन सामील करण्यासाठी अर्ज केल्याचे दिसुन येते.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना समन्स लागल्याचे पश्चात त्यांनी त्यांचे कैफियतीत बांधकाम करीत असल्याची बाब नाकारलेली नाही. परंतु केवळ सदरची दावामिळकत ही ७/१२ सदरी महादेव रामा आंबेकर यांचे नावे असल्याने वादीचा मालकी हक्क नाकारून कारवाई करणेचा हक्क देखील नाकारत आहेत व दाव्यात महादेव रामा आंबेकर हे आवश्यक असे पक्षकार असल्याचे कथन करीत आहेत. त्यामुळे श्री. महादेव रामा आंबेकर यांना प्रतिवादी क्. ३ म्हणुन सामील करणे, तसेच वादी याचे व इतर सहहिस्सेदार यांचे नावे मौजे विचारेवाडी, ता. म्हसळा, जि. रायगड येथे गावठाण क्. १/४३ ची मिळकत देखील निदर्शनास आलेली आहे. तरी दावा कलम १ मध्ये दावामिळकत म्हणुन सामील करणेस व प्रतिवादी क्. ३ म्हणुन रामा आंबेकर यांना पक्षकार म्हणुन सामील करण्यात यावी.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की दोन्ही दुरूस्त्या या दाव्याचा अंतिम निकाल होणेचे दृष्टीने आवश्यक आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलट दाव्याचे अंतिम निराकरण होणेस मदत होईल. कारण सदर दुरूस्ती केल्याचे पश्चात मिळकतीची मोजणी करता येईल व त्यामुळे निकालास मदत होणार आहे. याउलट सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान संभवत नाही.

४. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि. २३ वर दाखल करून म्हटले आहे की, वादीने दाखल केलेला सदरचा अर्ज कायदयाच्या प्रक्रियेविरूध्द दाखल केला असल्याने तो प्रतिवादीला मान्य व कबुल नाही. दाव्याचे स्वरूप पाहता, सदरचा दावा हा अतिक्रमणाचा

असल्याने व बेकायदेशीर बांधकाम दुर करून मिळण्याच्या मागणीकरिता असल्याने दावा मिळकतीचे स्वरूप वादी यांना माहिती असणे आवश्यक बाब आहे.

५. प्रतिवादीने पुढे असे म्हटले केले आहे की, सदर दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकाचे अवलोकन केले असता दावामिळकत ही महादेव रामा आंबेकर यांच्या मालकीची आहे. सदर दावामिळकतीशी वादीचा कसल्याही प्रकारे मालकी हक्क व वहिवाट असल्याची बाब दिसुन येत नाही. दावामिळकतीबाबतच वादीचा दावा असुन दावामिळकतीमध्ये गावठाण क्र. १ हिस्सा क्र. ४३ ही मिळकत दाव्यामध्ये सामील करण्याची मागणी केलेली आहे. दावामिळकतीमध्ये गावठाण क्र. १, हिस्सा क्र. ४३ ही मिळकत समाविष्ट करण्याचा सदरच्या अर्जानुसार प्रयत्न करीत आहे. वादीचा अर्ज मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपामध्ये बदल होणार असुन त्यामुळे दाव्याचे कामकाज चालविण्याकरिता वादी पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहे त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सबब, वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

६. वादी व प्रतिवादीच्या कथनांचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी खालील प्रश्ने उपस्थित होत असून त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| | **प्रश्ने** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | नियोजित दुरुस्ती ही दाव्यातील वादाचे निराकरण करण्याकरीता आवश्यक आहे का? | होकारार्थी |
| २. | नियोजित दुरुस्ती मंजुर होउन मिळण्यास वादी पात्र आहे का? | होकारार्थी |
| ३. | अंतिम आदेश काय? | अर्ज मंजूर |

**<u>: का र ण मी मां सा :</u>**

७. **प्रश्ने क. १ ते ३ बाबत** :- वादींचे अर्जातील कथन व प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

८. प्रस्तुत दाव्याचे स्वरूप पाहता सदर दावामिळकत ७/१२ सदरी महादेव रामा आंबेकर यांचे नाव असल्याने अशा परिस्थितीत वादीने सदर महादेव आंबेकर याची प्रस्तुत दाव्यातील आवश्यकता प्रथमदर्शनी दाखवुन दिलेली आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरूप पाहता, सदर महादेव आंबेकर याला प्रतिवादी पक्षकार म्हणुन सामील करून घेतल्यास दोन्ही पक्षांमधील संपुर्ण वादाचे पुर्णतः निराकरण होण्यास मदत होईल. तसेच, गावठाण क्र. १/४३ ची मिळकत देखील वादी यांच्या निदर्शनास आलेली आहे. सदर मिळकत दावा कलम १ मध्ये सामील केल्यास दोन्ही पक्षांमधील वाद संपुष्टात येतील. अशा परिस्थितीत एकुण तथ्ये व परिस्थिती पाहता सदर महादेव आंबेकर याला प्रतिवादी पक्षकार व दावा कलम १ मध्ये दावामिळकत गावठाण क्र. १/४३ सामील करणे न्यायाचे हितास्तव आवश्यक झालेले आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**: आ दे श :**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. महादेव रामा आंबेकर, वय : ५५ वर्षे, व्यवसाय : मजुरी, रा. हंस अपार्टमेंट, तिसरा माळा, रूम नं. ३०५, सर्व्हे नं. ३९९, हिस्सा नं. २ व ५, जयश्री जगनाथ नगर, ९० फिट लिंक रोड, विरार-पुर्व, वसई, ठाणे ४०१३०५ यांना प्रतिवादी पक्षकार क्र. ३ म्हणुन व दावा कलम १ मध्ये दावामिळकत म्हणुन गावठाण क्र. १/४३ सामील करण्यात येते.

३. वादी यांनी सदर दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

श्रीवर्धन.
दिनांक : २५.०६.२०१८.

(ए. एम. मुजावर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, श्रीवर्धन